# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

पंजि. कार्यालय :- एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४००३६

ईमेल: md@fdcm.nic.in, gm.hq@fdcm.nic.in,

CIN:U45200MH1974SGCO17206

Ph.No.0712-2811963, 2811964


## एफडीसीएम लिमी., मधील लिपीक–टंकलेखक (वर्ग–3) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात

जाहिरात कमांक एफडीसीएम/02/2018 दिनांक :- 20 NOV 2018

व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लिमिटेड, नागपूर, यांच्या अधिपत्याखाली दक्षिण व उत्तर चंद्रपूर प्रदेश (मिळुन) आणि नागपूर प्रदेश व जाखाका व वनीकरण प्रदेश (मिळुन) अंतर्गत विविध विभागातील लिपीक–टंकलेखक या संवगाचे रिक्त पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व एफडीसीएम लिमी., मध्ये भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांकडुन दिनांक 26 नोव्हेंबर, 2018 ते दिनांक 24 डिसेंबर, 2018 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. प्रस्तुत भरतीचा सविस्तर तपशील व अभ्यासक्रम https://maharecruitment.mahaonline.gov.in तसेच www.fdcm.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**उपलब्ध पदांचा तपशिल :–**

**दक्षिण चंद्रपूर प्रदेशाकरीता**

| कार्यालयाचे नांव | संवर्ग | पदाचे नाव | अजा | अज | विजाभज | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| दक्षिण चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर (दक्षिण चंद्रपूर प्रदेश व उत्तर चंद्रपूर प्रदेश मिळुन) | वर्ग 3 | लिपीक– टंकलेखक | 3 | 3 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 16 | 27 |

वरील उल्लेखित पदाकरीता समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| विशेष समांतर आरक्षण | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | खुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| महिला 30% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 5 | 8 |
| प्रकल्पग्रस्त 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भुकंपग्रस्त 2% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक 15 % | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 4 |
| अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अंशकालीन कर्मचारी 10% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| वनमजुर 10% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| दिव्यांग 3% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| अनाथ 1% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 3 | 09 |
| एकूण | 3 | 3 | 0 | 0 | 1 | 1 | 2 | 1 | 2 | 16 | 27 |

www.nmk.co.in

नागपूर प्रदेशाकरीता

| कार्यालयाचे नांव | संवर्ग | पदाचे नांव | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| नागपूर प्रदेश, नागपूर, (नागपूर प्रदेश, जाखाका व वनीकरण प्रदेश आणि मुख्यालय मिळुन) | वर्ग 3 | लिपीक–टंकलेखक | 6 | 2 | 2 | 0 | 1 | 1 | 4 | 1 | 6 | 20 | 39 |

वरील उल्लेखित पदाकरीता समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| विशेष समांतर आरक्षण | अजा | अज | विजाभज | | | | | विमाप्र | इमाव | खुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | एकूण | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| महिला 30% | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 6 | **12** |
| प्रकल्पग्रस्त 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| भुकंपग्रस्त 2% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | **0** |
| माजी सैनिक 15 % | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | **5** |
| अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू 5% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| अंशकालीन कर्मचारी 10% | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | **4** |
| वनमजुर 10% | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 4 |
| दिव्यांग 3% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| अनाथ 1% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 4 | **11** |
| एकूण | **6** | **2** | **2** | **0** | **1** | **1** | **4** | **1** | **6** | **20** | **39** |

2. पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा जानेवारी,2019 मध्ये आयोजित होण्याची शक्यता आहे. परिक्षेचा दिनांक एफ.डी.सी.एम.लिमिटेडच्या www.fdcm.nic.in व मे.महाऑनलाईन यांच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता उमेदवाराने नियमित संकेतस्थळाची पाहणी करावी.

3. भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक/समांतर आरक्षणात बदल करण्याचे अधिकार किंवा भरती प्रकिया कोणत्याही टप्प्यावर अंशतः/पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. वर नमुद केलेल्या प्रवर्गनिहाय पदसंख्येत जर कोणत्याही कारणास्तव बदल झाल्यास (वाढ किंवा कमी) झाल्यास त्याची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

4. महिला, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, माजी सैनिक, अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडु, अंशकालीन कर्मचारी व दिव्यांग (विकलांग) यांचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

www.nmk.co.in

5. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा–या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे. अ.जा. व अ.ज. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना आरक्षणाच्या लाभासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

6. वि.जा.–अ, भ.ज.–ब, भ.ज.–क, व भ.ज.–ड हे आरक्षित प्रवर्ग आंतरपरिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलबध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

7. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक राक्रीधो–2002/प्र.क्र.68/क्रीयुसे–2 दिनांक 1 जुलै,2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो–2002/प्र.क्र.68/क्रीयुसे–2 दिनांक 18 ऑगष्ट 2016 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडूच्या आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

7.1 प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणा–या उमेदवारांच्या बाबतीत त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो उमेदवार खेळाडू प्रवर्गातील आरक्षित पदासाठी पात्र ठरतो याबाबत, एफ.डी.सी.एम. लिमिटेडकडे अर्ज सादर करण्यापूर्वीच सक्षम प्राधिका–याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

www.nmk.co.in

8. एफ.डी.सी.एम.लिमिटेड मधील लिपीक–टंकलेखक पदासाठी (1) अल्पदृष्टी Partially sighted (2) अस्थिव्यंग one leg affected (3) कर्णबधिर Partially deaf या प्रकारच्या पात्रतेचे निकष धारण करणारे विकलांग उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र असतील. सदर विकलांग उमेदवाराची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

8.1 दिव्यांग (विकलांगासाठी) आरक्षित पदावर निवड करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची निवड करण्यात येईल.

8.2 विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेवु इच्छिणा–या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.अप्रकि–2012/प्र.क्र.297/आरोग्य–6 दिनांक 6 ऑक्टोबर,2012 मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

9. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही–2012/प्र.क्र.16/12/16–अ दिनांक 13 ऑगस्ट,2014 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

10. परिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची खुला (सर्वसाधारण) प्रवर्गातील पदावर निवड करण्यात येणार नाही. परीक्षा शुल्कामधील सवलत ही या प्रयोजनासाठी सवलत समजली जाणार नाही.

11. अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भात अटींची पूर्तता करणा–या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) खुला (सर्वसाधारण) पदावरील निवडीकरीता विचार होत असल्याने, सर्व मागास आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ आरक्षण प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमुद करणे बंधनकारक आहे.

12. **लिपीक–टंकलेखक या पदाची वेतनश्रेणी** (सहावे वेतन आयोगानुसार):– रू. 5200–.20200 अधिक ग्रेड पे रू.1900 व इतर नियमाप्रमाणे देय इतर भत्ते

13. **पात्रता:**

13.1 भारतीय नागरिकत्व

13.2 महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (सक्षम प्राधिका–याने दिलेला पुरावा सादर करणे आवश्यक राहिल)

13.3 **शैक्षणिक अर्हता:**

अ) B.Com.(pass with Accountancy as one of the subjects) from a recognized university. .

ब) Minimum English Typing speed 40 WPM and Marathi Typing speed 30 WPM.

क) Certificate MS-CIT or equivalent

शासन निर्णय,शालेय शिक्षण व कीडा विभाग,कमांक एसपीई 1012/108/12/साशि–1 दिनांक 31 ऑक्टोबर,2013 नूसार अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढुन विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता–बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी 30 शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी 40 शब्द प्रति मिनिट लागु असेल त्याप्रमाणे समकक्ष अर्हता म्हणुन स्वीकारार्ह आहे.

13.4 **टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट**

दिव्यांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, कमांक अपंग–2016/प्र.क.116/16–अ दिनांक 16 नोव्हेंबर 2016 नुसार त्यांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन 2 वर्षाचा कालावधी व 2 संधी देण्यात येतील.

माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास,सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन अकरा महिन्याच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरीता अर्ज करण्यास तात्पुरती परवानगी दिली जाईल.

13.5. **वयोमर्यादा** :–(उमेदवाराची वयाची गणना दि 1 डिसेंबर,2018 ला गणण्यात येईल.)

| किमान वयोमर्यादा वर्ष | कमाल वयोमर्यादा (वर्ष) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अमागास (वर्ष) | मागासवर्गीय | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक,आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार | प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त | अंशकालीन कर्मचारी/वनमजुर |
| | | | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | | | |
| 21 | 38 | 43 | 43 | 43 | 46 | 46 | 45 | 45 | 46 |

विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही.



www.nmk.co.in

13.6 उमेदवारांना मराठी लिहिता,वाचता,बोलता येणे अत्यावश्यक आहे.

14. **सेवाप्रवेशोत्तर शर्ती:–**

14.1 लिपीक–टंकलेखक पदासाठी परिविक्षाधिन कालावधी 2 वर्षाचा राहिल. सदर कालावधीत त्यांना एफ.डी.सी. एम.लिमिटेडने लिपीक–टंकलेखक पदाकरीता विहित केलेली विभागीय परीक्षा परिविक्षाधिन कालावधीमध्ये उत्तीर्ण करणे आवश्यक राहिल.

14.2 हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा जर ती व्यक्ती अगोदर उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर त्यांना ती परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

15. **प्रमाणपत्र पडताळणी:–**

15.1 उमेदवारांची पात्रता जाहिरात/शासन परिपत्रकातील अटी व शर्ती तसेच सदर पदासाठी असलेले सेवाप्रवेश नियमात विहित केलेली अर्हता मूळ कागदपत्राच्या आधारे नियुक्तीपूर्व सक्षम प्राधिका–याकडून तपासली जाईल. लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा–या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका–याकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानूसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेत घेण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

15.2 विहित कागदपत्रे सादर करू न शकणा–या उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मूदतवाढ देण्यात येणार नाही.

15.3 अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका–याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका–याकडून करण्यात येईल.

16. **निवड प्रक्रीयेची रुपरेषा :-**

16.1 लिपीक-टंकलेखक या पदावर भरतीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने संबंधीत उमेदवार हे फक्त कोणत्याही एका प्रदेशासाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकेल. एका पेक्षा जास्त प्रदेशासाठी अर्ज केल्याचे आढळल्यास पहिला सादर केलेला वैध अर्ज ग्राह्य धरुन इतर अर्ज रद्द समजण्यात येतील.

16.2. उमेदवारांनी ज्या प्रदेशाकरीता अर्ज केला आहे त्याची उमेदवारी फक्त त्या प्रदेशाकरीता मर्यादीत राहील.एका प्रदेशाकरीता आलेल्या पात्र अर्जानुसार व स्पर्धात्मक लेखी परीक्षेचे निकालाचे आधारावर तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादिनुसार त्या प्रदेशाकरीता निवड समिती/सक्षम प्राधिकारी यांनी प्रवर्गनिहाय अंतिम निवड करावयाची आहे.

16.3 लिपीक-टंकलेखक या पदाकरीता उमेदवारांची २०० गुणांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा ही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. प्रत्येक बरोबर उत्तराकरीता २ गुण देण्यात येतील व प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 0.5 गुण कपात करण्यात येईल (Negative marking)लेखी परीक्षा ही पूर्ण राज्यात एकाच दिवशी घेण्यात येईल. पात्र उमेदवारांची स्पर्धात्मक लेखी परिक्षा जानेवारी,2019 मध्ये आयोजित होण्याची शक्यता आहे. परिक्षेचा दिनांक एफ.डी.सी.एम.लिमिटेडच्या www.fdcm.nic.in व मे.महाऑनलाईन यांच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता उमेदवाराने नियमित संकेतस्थळाची पाहणी करावी.

16.4 लिपीक-टंकलेखक या पदाकरीता उमेदवारांची निवड करताना मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाही. स्पर्धात्मक लेखी परीक्षेच्या आधारावर गुणवत्तेनुसार व पात्रतेनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय निवड करण्यात येईल.



www.nmk.co.in

17. **परीक्षा शुल्क :** अमागास (खुला) उमेदवाराकरीता रू. 600/ मागासवर्गीय उमेदवाराकरीता रू.400/-
दिव्यांग अमागास उमेदवाराकरीता (खुला) रू.400/दिव्यांग मागासवर्गीय उमेदवाराकरीता रू.300/-

18. **अर्ज करण्याची पध्दत :-**

18.1 प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

18.2 पात्र उमेदवाराला वेब-आधारीत (Web-based) ऑनलाईन अर्ज https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे दिनांक 26.11.2018 ते दिनांक 24.12.2018 पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

18.3 ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://maharecruitment.mahaonline.gov.in तसेच www.fdcm.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

18.4 ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत फोटो (रुंदी ३ से.मी.x उंची 4.5 से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी 3 से.मी.x उंची 2.5 से.मी.) आणि 300 DPI Resolution आणि 50 k.b.पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टीप: फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/ स्वाक्षरी आढळल्यास उमेदवारांना परिक्षेमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

18.5 एफडीसीएम लि.ला चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

18.6 अर्ज ऑनलाईन अथवा महा ई-सेवा केंद्राद्वारे भरता येतील. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेकडून प्रत्येक जिल्हयात महा ई-सेवा केंद्र उघडण्यात आलेले आहेत. या महा ई-सेवा केंद्राची यादी www.mahaonline.gov.in किंवा https:// maharecruitment. mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. उमेदवाराने यापूर्वी maharecruitment.gov.in या वेबसाईट वर आपले खाते तयार केलेले नसल्यास उमेदवारास "नवीन वापरकर्ता नोंदणी" वर क्लिक करुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

18.7 त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जावुन स्वत:ची संपूर्ण माहिती भरावी लागेल. www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर यापूर्वी "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जावून स्वत:ची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरायची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल मधील माहिती कधीही अद्ययावत करु शकतो.

18.8 उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगिन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहिरातील "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या संदेश दाखविल्या जातील. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमूद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबींची पूर्तता करत असल्यास आपला अर्ज स्वीकारला जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

18.9 ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज भरु शकतात. त्याच वेळेस उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व रु.25/-एवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारास पैसे भरल्याची पावती (receipt) महा ई-सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल.फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालक कडून आकारली जाईल.

18.10 स्वत: ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.
(i) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकींग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड द्वारे

19. अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

20. **परीक्षाशुल्काचा भरणा करण्या करिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा. :-**

20.1 युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगिन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

20.2 " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "unpaid" असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.

20.3 "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर २ पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब)चलनाव्दारे

20.4 उमेदवारांना क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल. ऑनलाईनद्वारे परीक्षा शुल्क अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक 24.12.2018 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक राहील.



www.nmk.co.in

20.5. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांक 24.12.2018 पूर्वीच तपासणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही

20.6 चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त सेवाशुल्क आकारेल. उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना परीक्षा शुल्क व सेवाशुल्क बँकेकडे भरणा करावे लागेल.

20.7 भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन चलनाव्दारे परिक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक 26.12.2018 पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही,तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**22. प्रवेश प्रमाणपत्र :-**

22.1 प्रस्तुत परीक्षेपुर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपुर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

22.2 परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

22.3 परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, किंवा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थेकडून जारी केलेला फोटो ओळखपत्र यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची एक छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराला

**23. परीक्षेस प्रवेश**

23.1 उमेदवाराला फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची एक छायांकीत प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार महाऑनलाईनने/एफडीसीएम लि.ने परवानगी दिलेल्या साहित्यासह परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. त्याशिवाय इतर कोणतेही साहित्य परीक्षा कक्षात सोबत घेवुन जाण्यास अनुमती राहणार नाही.

23.2 डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधन, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वह्या,नोट्स, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाऑनलाईन/एफडीसीएम लिमिटेड किंवा शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

24. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परिक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी महाऑनलाईन/एफडीसीएम लि.च्या https://maharecruitment.mahaonline.gov.in तसेच www.fdcm.nic.in या संकेतस्थळावरील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्वसाधारण सूचनांचे/ माहितीचे कृपया काळजीपूर्वक अवलोकन करावे. मे.महाऑनलाईन/एफडीसीएम लि.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक

F.D.C.M. LTD. NAGPUR



www.mmk.co.in

## Syllabus for each of the sections

1. **Marathi Language (10 questions)**
    - Common Vocabulary
    - Punctuation
    - Simple Sentence Structure
    - Grammar
    - Use of idioms and phrases & their meaning

2. **English Language (10 questions)**
    - Spelling
    - Common Vocabulary
    - Punctuation
    - Expressions
    - Simple Sentence Structure
    - Grammar
    - Use of Idioms and phrases & their meaning

3. **General Knowledge ( 20 questions)**
    - Indian History & Geography
    - Indian Constitution
    - General Science
    - Ecology & Environment
    - Sports & culture
    - Current affairs
    - Right to Information Act.2005 & Maharashtra Right to Public Services Act 2015
    - Primary knowledge in Information and Communication Technology

www.nmk.co.in

4. **Numerical Aptitude and logical Reasoning ( 20 Questions)**

**Numerical Aptitude (10 questions)**

- Percentage.
- Average, Ratio & Proportion
- Interest, Profit & Loss, Discount
- Time , Work & distance
- Number System
- Geometry
- Statistics

**Logical Reasoning ( 10 Questions)**

- Coding and decoding - Small & Capital letters/numbers coding, decoding and classification
- Analogies - Symbolic/Number Analogy, Similarities and differences
- word building
- Blood Relationships etc.

5. **Accountancy (40 Questions)**

- Fundamental principles of accounting
- Financial Accounting
- Cost and management accounting
- Computerized accounting.

Place: Nagpur

Date: 16.11.2018

**Managing Director**

F.D.C.M. LTD. NAGPUR

www.nmk.co.in